# कामाप्रत बायबलचा दृष्टिकोन



आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ऑप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी. वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Biblical Attitude Towards Work)

# कामाप्रत बायबलचा दृष्टिकोन

# अनुक्रमणिका


1. काम परमेश्वराची कल्पना 1

2. कामासंबंधी चुकीच्या भावना 3

3. कामाविषयी विश्वासणाऱ्यांचा दृष्टीकोन 6

4. विश्वासणाऱ्यांस काम करण्याची आज्ञा देण्यात आली आहे 11

5. सात योग्य प्रवृत्ती 20

6. तुमच्या कामाशी संबंधित अभिवचने 25

7. नवीन जगात काम करणे 28

# 1
# काम परमेश्वराची कल्पना

**उत्पत्ति 1:31**
**आपण केलेले सर्व फार चांगले आहे असे देवाने पाहिले. संध्याकाळ झाली व सकाळ झाली. हा सहावा दिवस.**

**उत्पत्ति 2:1-3**
**1 ह्याप्रमाणे आकाश व पृथ्वी आणि तेथील सर्व काही सिद्ध झाले.**
**2 देवाने केलेले आपले काम सातव्या दिवशी संपवले, केलेल्या सर्व कामापासून त्याने सातव्या दिवशी विसावा घेतला.**
**3 देवाने सातवा दिवस आशीर्वाद देऊन पवित्र केला; कारण सृष्टी निर्माण करण्याचे काम संपवून त्याने त्या दिवशी विसावा घेतला.**

येथे आपण परमेश्वराला काम करतांना पाहतो. त्याने सहा दिवस काम केले व सातव्या दिवशी विसावा घेतला. पण आमच्या विपरीत, परमेश्वराने थकव्यामुळे विसावा घेतला नाही. त्याला जे काम करावयाचे होते ते त्याने पूर्ण केले—सृष्टीरचनेचे काम त्याने पार पाडले. त्याने पाहिले की जे काही त्याने केले होते ते चांगले व पूर्ण होते. म्हणून, त्याने थोडा वेळ विसावा घेतला.

पण ज्या क्षणी आदाम पापात पडला, परमेश्वराने पुन्हा काम करणे सुरू केले. तथापि, या वेळी, ते तारणाचे काम होते—मानवास स्वतःकडे आणण्याचे काम. त्या क्षणापासून, परमेश्वर मानवजातीसाठी त्याची मुक्तीची योजना प्रगट करीत सतत काम करीत राहिला आहे. परमेश्वर काम करतो!

**उत्पत्ति 2:15**
**परमेश्वर देवाने मनुष्याला मनुष्यास एदेन बागेत नेऊन तिची मशागत व राखण करायला करण्यास ठेवले.**

परमेश्वराने आदामास एदेन बागेत ठेवून त्याला असे म्हटले नाही, “आदामा, आता तुला फक्त माझी उपासना करावयाची आहे.” पतनापूर्वी, परमेश्वराने आदामास एक काम दिले होते. आदामाचे काम होते “जमिनीची मशागत करणे” (उत्पत्ति 2:15, मेसेज बाइबल).

आणि बाग सुव्यवस्थित राखणे. हे त्याचे काम होते, त्याचे कार्य! परमेश्वराने पतनापूर्वीच कामाची कल्पना परिचय करून दिली होती.

पतनानंतर, आदामाला जमिनीची मशागत करण्याचे काम सुरू ठेवावयाचे होते, पण आता जमीन शापित झाल्यामुळे आदामाला तिच्यात पीक उत्पन्न करण्यासाठी खूप कष्ट करावे लागणार होते (उत्पत्ती 3:17-19). आम्हा सर्वांचा विश्वास आहे की विवाह ही परमेश्वराची कल्पना आहे, म्हणून आपण वैवाहिक जीवनाचा आनंद घेतो. माहीत आहे की चर्च किंवा मंडळी ही परमेश्वराची कल्पना आहे, म्हणून आपण मंडळीचा आनंद घेतो. सुवार्ता ही आहे की काम सुद्धा परमेश्वराचीच कल्पना आहे. परमेश्वराने तिची स्थापना केली! म्हणून, आपण कामाचा आनंद घेऊ या!

# 2
# कामासंबंधी  चुकीच्या भावना

## काम हे अडखळण

आमच्यापैकी अनेक जण परमेश्वराच्या योजना आणि हेतू पूर्ण करण्याबाबत उत्साही असतात. पण आम्हां सर्वांना एक “नोकरी” किंवा काम आहे जेथे आपणास आठवड्यातून पाच किंवा सहा दिवस जावे लागते. कधी कधी, आपण विचार करू शकतो, “मला या कामापासून सुटका मिळाली तर बरे होईल, मी येशूची सेवा करावयास स्वतंत्र होईल.” आमची “नोकरी” किंवा “काम” आमचे स्वर्गीय पाचारण पूर्ण करण्याच्या मार्गात मोठे अडखळण दिसते. ही अतिशय चुकीची कल्पना आहे.  हे लक्षात ठेवावयाचे आहे की जोवर आम्ही या पृथ्वीवर आहो, तोवर  काम करण्याची गरज आहे—जे पूर्ण वेळ सेवेत आहेत त्यांना सुद्धा.

मी 12 वर्षांचा असतांना, जेव्हा मी बँगलोरमध्ये बिशप कॉटन मुलांच्या शाळेत शिकत होतो, तेव्हा माझे “तारण” झाले. येशूसाठी मला फार आवेश होता, संधी मिळताच मी त्याची सुवार्ता गाजवित असे. कधी कधी, मी स्वतःच प्रचार करण्यासाठी संधी तयार करीत असे. मला आठवते की मी माझ्या वर्गात उभा राहून संपूर्ण वर्गाला येशूविषयी सांगत असे. मी शेजारच्या दोन शाळांत सुद्धा जाऊ लागलो—बाल्डविन बॉयज हायस्कूल आणि कैथेड्रल स्कूल—आणि तेथे येशूची सुवार्ता गाजवू लागलो. तथापि, शाळेत जाणे, माझ्या “उगवत्या” सेवेच्या मार्गात मोठे अडखळण वाटू लागले आणि ज्या गोष्टीला “अभ्यास” म्हणतात हा आशिर्वादापेक्षा अडखळणं जास्त वाटत होता. असे वाटत होते की माझ्या अंतःकरणात एक गुप्त प्रार्थना होती—“हे परमेश्वरा,

मला यापासून सोडव. प्रभू, जर तू मला शाळेत जाऊन अभ्यास करण्यापासून मुक्त केलेस, तर मी देवाच्या राज्यासाठी आणखी काही करू शकतो आणि मी आणखी लोकांना येशूविषयी सांगू शकतो." देवाची स्तुती असो, त्याने मला त्यापासून सुटका दिली नाही! मला शाळेच्या पूर्ण प्रक्रियेतून जावे लागले आणि पुढे इंजीनियरिंग कॉलेजला जावे लागले, आणि त्यानंतर जसजसा समय पुढे वाढत गेला, अभ्यास का केला पाहिजे ते मला समजू लागले. परमेश्वराचा धन्यवाद असो की त्याने मला अभ्यास करणे बंद करावयास सांगितले नाही. पण मला हे कबूल करावे लागेल की एके क्षणी, अभ्यास करणे आणि शाळेत जाणे मला परमेश्वराच्या हेतूकडे वाटचाल करण्याच्या मार्गात मोठी अडचण वाटू लागले होते. आपले बायबल वाचणे, प्रार्थना करणे, साक्ष देणे, आणि प्रचार करणे याच्या तुलनेत ती सर्व पुस्तके वाचणे, गृहकार्य करणे, आणि परीक्षा देणे मला महत्वहीन वाटत होते. नंतर मला कळून आले की कामासंबंधी ही चुकीची मनोवृत्ती आहे.

## काम एक बंधन

काही लोक कामास एक बंधन समजतात. त्यांना बंधक मजूर किंवा काम करणारे गुलाम असल्यासारखे वाटते. ते सतत विचार करतात, "मला सकाळी उठावे लागते, मग ते मला आवडो किंवा न आवडो, आणि मला कामावर जावे लागते." कामाच्या ठिकाणी असलेले नियम आणखी कष्ट देतात. आम्ही कोठे काम करतो या आधारे, तेथे सकाळी 9 वाजता जाऊन सायंकाळी 6 किंवा 7 पर्यंत काम करावे लागते. कामाच्या ठिकाणी आपल्याला काही निश्चित गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य असते पण बाकी काही करण्याची परवानगी नसते. यामुळे, काही लोक त्यांच्या कामाकडे बंधन म्हणून पाहतात. आमच्यापैकी काही जण नियम आणि अधिकारी दोघांविरूद्ध बंड करू शकतात.

आम्हांला हे समजण्याची गरज आहे की कामाच्या ठिकाणी

नियम हे बंधन नाहीत, पण खरे म्हणजे ते शिस्तीचा मार्ग मोकळा करते. आम्हांला बंधन आणि शिस्तीतील फरक समजण्याची गरज आहे. आम्हांला ख्रिस्ताठायी स्वातंत्र्य आहे (गलतीकरांस पत्र 2:4; गलतीकरांस पत्र 5:1; 2 करिंथ 3:17). पण आम्ही हे देखील समजले पाहिजे की ख्रिस्ताठायी असलेल्या तंत्र्यात सुद्धा मर्यादा आहेत (गलतीकरांस पत्र 5:13). म्हणून, आम्हास जे हवे ते आम्ही करू शकत नाही. म्हणून कामाकडे बंधन म्हणून न पाहता स्वतःस शिस्त लावण्याची संधी म्हणून पाहावे.

## काम हे जरूरी वाईट

काही लोक कामास हे जरूरी वाईट समजतात—अशी गोष्ट जी केलीच पाहिजे यासाठी की आम्हांस देणे चुकविता यावे. अर्थात, आम्हांस काम करण्याची गरज आहे यासाठी की आम्हांस पोट भरता यावे आणि आमच्या कुटूंबांच्या गरजा पुरविता याव्यात. तथापि, अनेकांस त्यांचे काम आवडत नाही आणि ते तक्रार करतात आणि कुरकुरतात. विश्वासणारे म्हणून, आम्हांस आपल्या कामाचा आनंद घ्यावयास शिकले पाहिजे आणि त्यास जरूरी वाईट समजणे सोडले पाहिजे.

## काम ही उपासना

काही लोक सतत काम करीत असतात, आणि या चुकीच्या कल्पनेने काम करतात की काम ही उपासना आहे. या प्रवृत्तीने आमच्या कार्यसंस्कृतीवर प्रभुत्व करावयास सुरूवात केली आहे. काम ही उपासना नाही कारण उपासना म्हणजे देवासोबत संवाद साधणे होय. आपण परमेश्वराचा विचार न करताही काम करू शकतो.

# 3
# कामाविषयी विश्वासणाऱ्यांचा दृष्टीकोन

विश्वासणारे म्हणून, कामाचा आमचा दृष्टीकोन काय असला पाहिजे? आम्ही कामाकडे, व्यवसायाकडे, आणि देवाने  दिलेल्या करियरकडे कसे पाहिले पाहिजे? येथे तीन दृष्टीकोन आहेत, ज्यांस मी प्रत्येक विश्वासणाऱ्यासाठी महत्वपूर्ण समजतो.

## काम हे एक माध्यम आहे

आपले काम, नोकरी, अथवा कामधंदा पृथ्वीवर परमेश्वराचे हेतू पूर्ण करण्याचे माध्यम आहे. ते असे माध्यम आहे ज्याद्वारे पृथ्वीवर परमेश्वराचे हेतू प्रगट होतात. दुसऱ्या शब्दांत, व्यक्तीच्या जीवनासाठी देवाची इच्छा आणि हेतू अमलात आणण्यासाठी काम हे देवाने दिलेले साधन आहे. मला हे समजते की काहींना पूर्ण वेळ सेवेसाठी पाचारण करण्यात आले आहे. पण पूर्ण वेळ सेवासुद्धा एका अर्थाने “काम" आहे.

## काम एक धोरण आहे

आपण समजून घेतले पाहिजे आणि देवाच्या रणनीतीचा एक भाग म्हणून आपल्या कार्याकडे पाहण्यास सुरुवात केली पाहिजे जेणेकरून आपण त्याची इच्छा आणि हेतू पूर्ण करण्यास सक्षम व्हावे. आपण हे समजले पाहिजे आणि आमच्या कामाकडे देवाच्या कार्यपद्धतीचा भाग म्हणून पाहिले पाहिजे यासाठी की आम्हास त्याची इच्छा आणि हेतू पूर्ण करता यावे. उदाहरणार्थ, विश्वासणारे या नात्याने, लोकांस प्रभूसाठी जिकंण्याचे मोठे ओझे तुम्हाला असू शकते. तुमचे काम आणि तुमचे व्यावसायिक करियर तुम्हाला अशा लोकांच्या संपर्कात आणेल

ज्यांच्याशी अन्यथा तुमची कधीही भेट झाली नसती. तुम्ही आता तुमचे काम हे देवाने तुमच्यासाठी आखलेली योजना मानली पाहिजे. देव तुमच्या व्यवसायाचा उपयोग तुम्हाला धोरणात्मकरित्या अशा लोकांशी जोडण्यासाठी करीत आहे ज्यांना तुम्ही ख्रिस्ताविषयी सांगावे असे त्याला वाटते. तुमचे काम तुमचे "पुलपिट" आहे आणि ज्या लोकांशी तुम्ही संवाद साधता ते तुमचे "पॅरिश" अर्थात धर्मप्रांत आहे.

## काम ही तयारीची प्रक्रिया आहे

काम हे फक्त पैसे कमावण्याचे ठिकाण नाही तर असे स्थान आहे जेथे देव आमचे चारित्र्य घडवितो. तो आमच्या तयारी प्रक्रियेचा एक भाग आहे. आपल्याला असे वाटते की चारित्र्य फक्त सण्डेस्कूलमध्ये, चर्चमध्ये किंवा बायबलच्या शाळेत घडविले जाते, परंतु देव कुठेही आपले चारित्र्य घडवू शकतो. तो आपल्या जीवनात दिवसातील 24 तास काम करतो.

आपल्या कामाच्या ठिकाणी, देव आपल्याला लोकांशी कसा व्यवहार करावा, वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये कसे वागायचे, दैवी बुद्धीचा उपयोग कसा करावा आणि समस्यांचे निराकरण कसे करावे हे शिकवू शकतोआपल्यापैकी काही जणांना आपल्या कामाच्या ठिकाणी असे लोक सापडतील जे आपल्या शरीरात काट्यांसमान वाटतील, ज्यांच्याशी आपण संबंध ठेवू शकत नाही. परंतु देव आपल्या कामाच्या ठिकाणी आमचे चारित्र्य विकसित करू शकतो. तसेच, आपल्या कामाच्या ठिकाणी, आपल्याला नवीन कौशल्ये शिकण्याची आणि आपल्या क्षमता विकसित करण्याची संधी मिळू शकते, ज्यांचा उपयोग देव त्याच्या राज्याच्या विस्तारासाठी करू शकतो. उदाहरणार्थ, तुम्ही तुमच्या कामाच्या ठिकाणी नेतृत्व कौशल्ये शिकू शकता आणि देव ती कौशल्ये तुमच्या स्थानिक चर्चमधील एका विशिष्ट सेवेत उपयोग करू शकतो, अशाप्रकारे तुम्हाला तेथे आशीर्वाद ठरवील.

आपण बायबलमधील काही लोकांचा विचार करू या.

## योसेफ

### *भविष्यसूचक स्वप्न व योजना पूर्ण करणे*

योसेफाचा विचार करा. योसेफाजवळ देवाने दिलेला दृष्टांत, देवाने दिलेले स्वप्न होते. पण तो सर्वकाही सोडून सरळ "वेळ सेवेत" गेला नाही. योसेफ देवाच्या तयारीच्या प्रक्रियेतून गेला. त्या प्रक्रियेत त्याला पोटिफरच्या घरात काम करणे आणि त्याला तेथे जे करावयास सांगण्यात आले होते ते करणे भाग होते. तेथून त्याला त्याचा दोष नसतांनाही तुरूंगात फेकण्यात आले आणि तुरूंगातही त्याला काम करावे लागले. त्याला इतर सर्व कैद्यांची जबाबदारी देण्यात आली. नंतर त्याला मिसर देशचा पंतप्रधान म्हणून पदोन्नती मिळाली आणि येथेसुद्धा त्याला काम करावे लागले. त्याला पूर्ण वेळ सेवेसाठी पाचारण करण्यात आले नव्हते, तरीही देवाने त्याला तेथे ठेवले होते आणि आपला दैवी हेतू पार पाडण्यासाठी त्याला ते पद दिले होते. योसेफाने मिसर देशचा पंतप्रधान म्हणून काम केले आणि देवाने त्याचा उपयोग स्वप्न पूर्ण करण्यासाठी केला, जे देवाने योसेफास त्याच्या बालपणी दिले होते. योसेफाने पंतप्रधान म्हणून आपले काम सोडले असते आणि कोठेतरी एखाद्या रानातील मठात गेला असता, तर काय झाले असते? देवाने त्याला दिलेली स्वप्नाची पूर्णता त्याने कदाचित कधीच पाहिली नसती!

या गोष्टीचा विचार करा. योसेफाच्या अनेक वर्षांपूर्वी, देव अब्राहामाशी बोलला होता आणि त्यास म्हणाला की तो त्याच्या संततीस परक्या देशात घेऊन जाईल. *"परमेश्वर अब्रामाला म्हणाला, तू निश्चितपणे समज की जो देश स्वतःचा नाही, अशा देशात तुझे संतान उपरे होऊन राहील व तेथील लोकांचे दास्य करील, आणि ते लोक चारशे वर्षे त्यांना छळतील. मग ज्या राष्ट्राचे दास्य ते करतील त्याचे*

*मी पारिपत्य करीन, त्यानंतर ते पुष्कळ धन घेऊन तेथून निघतील"* (उत्पत्ती 15:13,14). देवाने योसेफास दिलेल्या कौशल्याचा आणि "व्यावसायिक" कारकीर्दीचा उपयोग त्यास त्या पदावर पोहोचविण्याचे माध्यम म्हणून केला यासाठी की त्याला ही भविष्यसूचक योजना पार पाडता यावी.

आमच्यापैकी अनेकांस समाज, शहर, आणि राष्ट्रांसाठी परमेश्वराच्या भविष्यसूचक योजनांची जाणीव नाही. त्याच्याजवळ *'कैरोस'* (*कैरोस* [ग्रीक] चा उपयोग विशिष्ट घटना, योग्य क्षण, महत्वपूर्ण घटना, आणि वेळेतील बदलांच्या संदर्भात केला जातो) क्षण आणि दैवीय प्रवेश बिंदू (बिजागर) आहेत जेथे समाज, शहर, आणि राष्ट्रांसाठी संधीची दारे उघडतील. परमेश्वर "योसेफांच्या" शोधात आहे ज्यांना तो समाजात, शहरांत, आणि राष्ट्रांत त्याच्या भविष्यसूचक योजनांची परिपूर्ती घडवून आणण्यासाठी त्यांच्या कौशल्यांचा आणि व्यावसायिक पात्रतांचा उपयोग करून पदारूढ करू शकतो.

## दावीद, दानीएल, आणि पौल

### *ऐहिक आणि आध्यात्मिक यांचे साहचर्य*

दावीद स्तोत्रकर्ता, संदेष्टा, आणि राजा होता. दानीएल फक्त संदेष्टा नव्हता तर पंतप्रधान सुद्धा होता जो शासनाचे संचालन करीत होता आणि राजाचा कारभारही चालवीत होता. पौलाचा विचार करा. आम्ही त्याला एक थोर प्रेषित म्हणून जाणतो ज्याने बहुतांश नवीन करार लिहिला. हा उल्लेख करण्यासाठी भरपूर पुरावा आहे की कमीत कमी तीन शहरे जेथे तो गेला—इफिस, करिंथ, आणि थेस्सलोनिका—तेथे त्याने आपल्या गरजा आणि आपल्या सेवासंघाच्या गरजा पुरविण्यासाठी काम केले. त्याने स्वतःच्या हाताने काम केले आणि स्वतःच्या गरजांची काळजी घेतली, ज्यांची तो सेवा करीत होता त्यांच्यावर त्याने ओझे टाकले नाही.

दावीद, दानीएल, आणि पौल यांच्यात आपण "ऐहिक" आणि "आध्यात्मिक" यांचे साहचर्य—संमिश्रण—पाहतो. आम्ही अशा ठिकाणी आले पाहिजे जेथे आपण कामास ऐहिक बाब आणि देवासोबत चालण्यास आध्यात्मिक, कामापासून स्वतंत्र म्हणून वेगळे करता कामा नये. तुमच्या कामाकडे देवासोबत तुमच्या चालण्याचा भाग म्हणून पाहावे. आपल्या जीवनासाठी देवाच्या योजनेचा हा भाग आहे. दावीद, दानीएल, आणि पौल यांनी काम केले म्हणून आपला अभिषेक गमावला नाही! तुमचे काम "आध्यात्मिक" आहे केवळ यासाठी कारण देव काम करतो.

# 4
# विश्वासणाऱ्यांस काम करण्याची आज्ञा देण्यात आली आहे

नवीन करारात, प्रभू येशूने विश्वासणाऱ्यांस मोठी आज्ञा दिली की त्यांनी संपूर्ण जगात जाऊन सुवार्ता गाजवावी. नवीन कराराची मंडळी असा निर्णय घेऊ शकत होती की तारण पावलेल्या प्रत्येक व्यक्तीने त्यांचा “ऐहिक” जगातील सहभाग सोडून द्यावा आणि जाऊन केवळ सुवार्ता गाजवावी. पण या गोष्टीकडे लक्ष देणे अत्यंत मनोरंजक आहे की प्रेषित पौलाने विश्वासणाऱ्यांस काय करावयाची आज्ञा दिली.

## आपल्या हातांनी उद्योग करावा

**इफिसकरांस पत्र 4:28**
**चोरी करणाऱ्याने पुन्हा चोरी करू नये; तर त्यापेक्षा गरजवंताला देण्यास आपल्याजवळ काही असावे म्हणून जे चांगले ते आपल्या हातांनी करून उद्योग करत राहावे.**

चोरी करणाऱ्याने यापुढे चोरी करू नये तर आपल्या हातांनी काम करावे. त्याने स्वतःच्या हातांनी परिश्रम करावे, योग्य ते, आणि जे चांगले आहे ते करावे यासाठी की त्याच्याजवळ त्याच्या स्वतःच्या गरजांसाठी आणि गरजवंतांस देण्यासाठी भरपूर असावे. येथे, पौलाने विश्वासणाऱ्यांस त्यांच्या स्वतःच्या हातांनी काम करण्याचे मोल अथवा महत्व शिकविले. त्याने त्यांस असे काम करण्यास देखील शिकविले जे चांगले होते. याचा अर्थ हा की विश्वासणारे अशा कामात सहभागी होऊ शकत नाहीत जे अप्रामाणिकपणाचे किंवा भ्रष्ट आहे.

# काम करा यासाठी की तुम्हाला कशाचीही उणीव असता कामा नये

**1 थेस्सल 4:11,12**
**11 बाहेरच्या लोकांबरोबर सभ्यतेने वागावे, आणि तुम्हांला कशाचीही गरज पडू नये म्हणून,**
**12 आम्ही तुम्हांला आज्ञा केल्याप्रमाणे स्वस्थ राहणे, आपापला व्यवसाय करणे, आणि आपल्या हातांनी काम करणे, ह्यांची हौस तुम्हांला असावी.**

पौलाने विश्वासणाऱ्यांस त्यांच्या स्वतःच्या हातांनी काम करावयास सांगितले यासाठी की तारण न पावलेल्यांस त्यांच्यावर अयोग्य वर्तनाचा माझा देव आपल्या संपत्त्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरवील. आरोप लावता येऊ नये. तसेच या गोष्टीकडे लक्ष द्या की आपल्या स्वतःच्या हातांनी काम करण्याचा संबंध कसलीही उणीव नसण्याशी अथवा आपल्या सर्व गरजा पूर्ण होण्याशी आहे. काही लोक त्यांच्या सर्व गरजा पुरविण्यासाठी "देवाची वाट बघत" घरी बसतात. हे खरे आहे की देवाने त्याच्या संपत्त्यनुरूप आपली *"सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे"* (फिलिप्पैकरांस पत्र 4:19) पुरविण्याचे अभिवचन दिले आहे. पण हे देखील खरे आहे की त्याच्या वचनात, देवाने काम करण्याची आज्ञा दिली आहे, अशाप्रकारे हे दर्शविले आहे की तो आमच्या कामाचा उपयोग असे माध्यम म्हणून करील ज्याद्वारे तो आमच्या सर्व गरजा पुरविल्या जातील. आमच्या कामाच्या माध्यमाने देव आमच्या सर्व गरजा पुरविल ही गोष्ट तितकीच अलौकिक आहे जितकी की कावळ्याने पैश्याच्या नोटांचा बंडल घेऊन यावा! हे तितकेसे नेत्रदीपक नसेल, पण अलौकिक मात्र आहे, कारण तोच परमेश्वर आमच्या गरजा पुरवित आहे. लक्षात ठेवा नोकरी मिळविण्यासाठी, राखून ठेवण्यासाठी, पगार मिळविण्यासाठी आणि आपल्या संपूर्ण व्यावसायिक कारकिर्दीत बढती मिळविण्यासाठी देवाची कृपा आणि दैवीय प्रबंध हवा.

काही लोक वाट पाहत आहेत की ते ज्यांस "अलौकिक" माध्यम समजतात, त्याद्वारे देव त्यांच्या गरजा भागवील, जसे की लोक त्यांच्याजवळ येऊन त्यांच्या हातात पैसे ठेवतील किंवा डाकद्वारे त्यांना चेक मिळेल. जेव्हा या गोष्टी घडतांना ते पाहत नाहीत, तेव्हा ते विचार करू लागतात की देव त्यांच्या गरजा का पुरवित नाही. तथापि, देव अशा लोकांची वाट पाहत आहे की त्यांनी त्या माध्यमाशी प्लग जोडावा ज्याद्वारे तो त्यांच्या गरजा पुरविल. काही बाबतीत, देव त्यांची वाट पाहत असतो की त्यांनी नोकरी करावी आणि काही काळ त्यामध्ये टिकून राहावे. ती नोकरी त्यांच्या जीवनांसाठी तरतूदीचे देवाचे माध्यम आहे.

## जर तुम्ही काम करीत नाही, तर तुम्ही खाऊ नये!

**2 थेस्सल 3:7-12**

**7 आमचे अनुकरण कोणत्या रीतीने केले पाहिजे हे तुम्हा स्वतःला ठाऊक आहे; कारण आम्ही तुमच्यामध्ये असताना अव्यवस्थितपणे वागलो नाही;**
**8 आणि आम्ही कोणाचे अन्न फुकट खाल्ले नाही; परंतु तुमच्यापैकी कोणावरही भार घालू नये म्हणून आम्ही रात्रंदिवस श्रम व कष्ट करून काम केले.**
**9 तसा आम्हांला अधिकार नाही असे नाही, पण आमचे अनुकरण करण्यासाठी आम्ही तुम्हांला कित्ता घालून द्यावा म्हणून असे केले.**
**10 कारण आम्ही तुमच्याबरोबर होतो तेव्हादेखील आम्ही तुम्हांला अशी आज्ञा केली होती की, कोणाला काम करण्याची इच्छा नसेल तर त्याने खाऊही नये.**
**11 तरी तुमच्यामध्ये कित्येक अव्यवस्थितपणाने वागणारे असून ते काहीएक काम न करता लुडबुड करतात, असे ऐकतो.**
**12 अशा लोकांना आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने आज्ञा व बोध करतो की, त्यांनी स्वस्थपणे काम करून स्वतःचेच अन्न खावे.**

नवा करार आज्ञा देतो की आपण शांतपणे काम करावे आणि अव्यवस्थितपणे न वागता आपले स्वतःचे अन्न खावे, काहीहि काम न करता दुसऱ्याच्या भरवशावर जगू नये. विश्वासणाऱ्यांस काम ही नवीन कराराची आज्ञा आहे.

# स्वतःच्या घराची तरतूद करा

**1 तीमथ्य 5:8**
**जर कोणी स्वकीयांची व विशेषेकरून आपल्या घरच्यांची तरतूद करत नाही, तर त्याने विश्वास नाकारला आहे; तो माणूस विश्वास न ठेवणाऱ्या माणसापेक्षा वाईट आहे.**

मी त्या लोकांना आव्हान देऊ इच्छितो ज्यांना तथाकथित पूर्ण वेळ सेवेसाठी पाचारण करण्यात आले आहे. सेवकांनो, काही गोष्टी आहेत ज्या आपणास लक्षात ठेवण्याची गरज आहे; देवाने आपल्या वचनांत तुम्हाला काही जवाबदाऱ्या दिल्या आहेत ज्या तुम्हाला पूर्ण करावयाच्या आहेत. यापैकी एक आहे आपल्या स्वतःच्या घराण्याच्या गरजा पुरविणे. अनेक स्त्री आणि पुरुष घाईघाईने आपली नोकरी सोडतात आणि विश्वासाने जगण्याचा दावा करतात. विश्वासाने जगण्याचा अर्थ आपली नोकरी सोडणे नव्हे, नोकरी टिकवून ठेवण्यासाठी विश्वास लागतो. कधी कधी, लोक त्यांची नोकरी सोडून सेवेत जातात, आणि मग आपल्या स्वतःच्या कुटुंबांतील सदस्यांना अन्न पुरविण्यासाठी धडपड करतात. मी काही संकटसमयांविषयी बोलत नाही कारण आम्हां सर्वांनाच त्यामधून जावे लागते. तथापि, कारण तुम्ही पूर्ण वेळ सेवेत आहात म्हणून जर अनेक दिवस, अनेक महिने तुमच्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा पुरविल्या जात नसतील तर जोवर तुमची सेवा तुमच्या गरजा पुरविण्यास सक्षम होत नाही, तोवर तुम्हाला खरोखर नोकरी करण्याचा विचार करण्याची गरज आहे. म्हणून, पूर्ण वेळ सेवेसाठी पाऊल उचलण्यापूर्वी, याची खात्री करून घ्या की तुम्ही आपल्या, आणि आपल्या घरच्यांच्या आर्थिक गरजांची काळजी घेऊ शकता. जर तुम्ही आपल्या पत्नी मुलांची काळजी घेण्यास तयार नसाल तर तुम्ही लग्न करू नये. तुम्ही तुमच्या घराण्याची जवाबदारी पार पाडावी ही देवाची इच्छा आहे.

# माझी साक्ष

बँगलोरमध्ये माझ्या शालेय शिक्षणाच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये, मी सेवाकार्यासाठी खूप आवेशाने भरलेला होतो. मी प्रार्थना केली की मी दहावी पूर्ण केल्यावर पूर्णवेळेच्या सेवेत जावे. असे केल्यावर लगेच, मी माझ्या पालकांना खूप त्रास दिला आणि आग्रह धरला की मला माझे ऐहिक शिक्षण चालू ठेवायचे नाही तर सेमिनरीमध्ये जायचे आहे. म्हणून, मी भारतातील बायबल महाविद्यालये शोधली आणि पुण्यातील एका बायबल महाविद्यालयाला पत्र पाठवले. कॉलेजने एक पत्र परत पाठवले की मी अजून खूप लहान आहे आणि त्यात दाखल होण्यासाठी किमान पात्रता बारावी आहे. मला मिळालेल्या पत्राने माझी निराशा केली. असो, ऐहिक शिक्षणाला अजून दोन वर्षे उरली असल्याने, मी आवश्यक शिक्षण पूर्ण केल्यानंतर सेमिनरीमध्ये जाण्याचा निर्णय घेतला.

मात्र, पुढच्या दोन वर्षांत माझ्याबाबतीत काहीतरी घडले. मी बँगलोरमधील एका चर्चमध्ये जात असे आणि तिथे मला काहीतरी दिसून आले. मी लोकांचे दोन गट पाहिले—एक लोकांचा समूह ज्यांनी चर्चमध्ये विविधप्रकारे सेवा केली आणि दुसरा समूह, बहुसंख्य लोक, जे चर्चला गेले परंतु त्यांनी काहीही केले नाही. दुसरा गट हा बहुतेक विद्यार्थी आणि व्यावसायिकांचा होता ज्यांनी स्वतःला कोणत्याही प्रकारच्या सेवाकार्यातून वगळले होते असे वाटत होते कारण ते स्वतःला त्यांच्या कामात खूप व्यस्त समजत होते. मला आश्चर्य वाटले की बहुतेक “सामान्य” विश्वासणारे कधीच सेवेत का सामील होत नाहीत? याच काळात माझ्या मनात दृढनिश्चयाची भावना आली. मी माझ्या जीवनात लोकांना दाखवून देण्याचा दृढनिश्चय केला की एखाद्याला करिअर, नोकरी असूनही, “सामान्य जीवन” जगत असतांनाही देवाची सेवा करता येते. म्हणून, बारावी पूर्ण करीत असताना, माझी सेमिनरीमध्ये जाण्याची सर्व इच्छा संपली आणि त्याऐवजी मला आयुष्यात काय

करायचे आहे याविषयीच्या हेतूची नवीन जाणीव मला झाली.

या वेळी, देवाने माझ्या हृदयात बंगलोर शहरात एक मजबूत चर्च स्थापन करण्याची आणि तेथून भारत देशात पोहोचण्याची आणि जगातील राष्ट्रांवर प्रभाव टाकण्याची इच्छा उत्पन्न केली. म्हणून, मी शाळेत बारावी पूर्ण केली आणि नंतर माझ्या पालकांनी मला मणिपाल येथील इंजीनियरिंग महाविद्यालयात पाठवले. या वेळेपर्यंत, मी माझ्या अभ्यासाकडे ओझे म्हणून पाहणे बंद केले होते आणि माझे शिक्षण हे दैवी रणनीतीचा भाग असल्याचे समजू लागलो होतो. माझे शिक्षण चालू ठेवल्यामुळेच मी स्वतःला अशा ठिकाणी पाहिले जेथे मी देवाच्या राज्यासाठी आणखी लोकांपर्यंत पोहोचू शकलो.

मणिपाल येथील विद्यापीठ परिसरात मी संपूर्ण भारतातून आणि जगाच्या इतर भागातून आलेले शेकडो विद्यार्थी पाहिले. तेथे अभ्यास करण्यामागे एक आध्यात्मिक हेतू आहे असा माझा विश्वास होता.

माझी मनापासून इच्छा होती की मी देवाची सेवा करावी आणि तेथेच आत्मे जिंकावे. इंजीनियरिंग कॉलेजमध्ये माझ्या तिसऱ्या वर्षी, जानेवारी 1989 मध्ये, प्रभूने विद्यार्थी सहभागिता स्थापन करण्याच्या प्रयत्नाकडे मला प्रेरित केले जे नंतर स्थानिक मंडळीत बदलले आणि आजही सुरू आहे. आता मला आपले शिक्षण ओझे, आवश्यक वाईट, किंवा बंधन वाटत नव्हते. ते एक माध्यम, दैवीय कार्यपद्धती, आणि भविष्याच्या सेवेसाठी तयारीची प्रक्रिया असल्याचे मला समजले. इंजीनियरिंगमध्ये माझी स्नातक पदवी पूर्ण केल्यानंतर, मी माझे शिक्षण सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. माझ्या आईवडिलांनी मला उच्च शिक्षणासाठी युनायटेड स्टेट्स जाण्यासाठी मदत केली. मी दाखला घेतलेल्या क्लीव्हलँड, ओहिओ येथील विद्यापीठातील इंजीनियरिंग विभाग, जिथे मी प्रवेश मिळवला तो, संयुक्त राष्ट्रामधील पहिल्या

तीनपैकी एक होता. देवाच्या कृपेने मला दुसऱ्या सेमिस्टरमध्ये दोन तृतियांश आर्थिक मदत आणि तिसऱ्या सेमिस्टरपासून पूर्ण मदत मिळाली.

विद्यापीठात शिकत असताना आणि संशोधन करत असताना, मी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे लहानशी सहभागिता सुरू करू शकलो जेथे आमच्यासोबत भारत, इंडोनेशिया आणि मलेशियाचे विद्यार्थी होते. नंतर, मी न्यू जर्सी येथे गेलो आणि सुमारे 200 ख्रिस्ती विद्यार्थी असलेल्या कोरियन ख्रिश्चन फेलोशिपमध्ये सहभागी झालो. हे कोरियन विद्यार्थी इतक्या आत्मीयतेने प्रार्थना कशी करीत हे पाहणे अद्‌त होते.

या काळात, मी विद्यापीठाच्या परिसराजवळ असलेल्या आफ्रिकन-अमेरिकन चर्चमध्ये नियमितपणे सेवाही केली. एक वर्षांहून अधिक काळ, मी दर बुधवारी रात्री या आफ्रिकन-अमेरिकन चर्चमध्ये शिकविले, आणि त्यांच्या रविवारच्या भक्तीमध्ये आणि तंबूच्या सभांमध्ये वेळोवेळी उपदेश दिला.

भारतातून माझ्यासोबत दाखल झालेल्या ॲमीशी लग्न केल्यानंतर मी विद्यापीठ सोडले आणि सॉफ्टवेअर व्यावसायिक म्हणून काम करू लागलो. या काळात, ॲमी आणि मी आणखी एका तरुण हिस्पॅनिक जोडप्यांसोबत एकत्र काम केले आणि आम्ही न्यू ब्रून्सविक, न्यू जर्सी येथे हिस्पॅनिक चर्चची स्थापना केली. अनेक पार्श्वभूमीतील लोकांसोबत वेगवेगळ्या संस्कृतीमधून आलेल्या लोकांसोबत कार्य करण्यास सक्षम होण्यासाठी हा एक समृद्ध करणारा अनुभव होता. भविष्यातील सेवेसाठी ही एक उत्तम प्रशिक्षण भूमी होती जी शक्य झाली कारण मी माझ्या पदवी शिक्षणासाठी यूएसएला गेलो होतो.

न्यू जर्सीहून, आम्ही 1998 मध्ये शिकागोला आलो. 1999 मध्ये भारताच्या सेवा प्रवासादरम्यान, मला असे वाटले की  भारतात परत जाण्याची आणि आमच्या अंतःकरणातील दर्शन पूर्ण करण्याची

वेळ आली आहे. म्हणून, आम्ही जानेवारी 2001 हा महिना म्हणून चिन्हांकित केला जेव्हा आम्ही बंगलोरला परत येऊ. आम्ही शिकागो ते बंगलोर या प्रवासाची तयारी करू लागलो, तेव्हा आमच्या चिंतेपैकी एक म्हणजे भारतात आमची सेवा सुरू करण्याचे साधन शोधणे ही होती. आम्ही शिकागो येथील एका अतिशय लहान मंडळीचा भाग होतो. आमच्या अंतःकरणात असलेले मोठे दर्शन पूर्ण करण्यासाठी ते मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत देऊ शकणार नाहीत. जेव्हा आम्ही प्रभूजवळ प्रार्थना करू लागलो, तेव्हा मला स्पष्टपणे माझ्या अंतःकरणात जाणवले की तेथून परतल्यावर मी माझ्या सॉफ्टवेयर क्षेत्रात काम करीत राहावे. माझा व्यवसाय बंद करावा याविषयी मला प्रभूकडून कुठलेही मार्गदर्शन नव्हते. काही वर्षांनी, विशेषेकरून, अमेरिकेतील आमच्या वास्तव्याच्या शेवटी, मला ख्रिस्ती तत्वांच्या आधारे व्यवसाय करावा आणि देवाच्या राज्यासाठी पैसा आणावा अशी एक कंपनी सुरू करण्याची गंभीर इच्छा होती. ही इच्छा माझ्या अंतःकरणात बराच काळपासून वाढत होती, पण हे कसे करावे आणि केव्हा करावे हे मला माहीत नव्हते.

शेवटी आमची भारतात येण्याची वेळ आली. डिसेंबर 2000 मध्ये आम्ही राष्ट्रांना सुवार्ता सांगण्याचे मोठे दर्शन घेऊन, अमेरिका सोडले—पण मुळीच कल्पना नव्हती की ही सेवा चालविण्यासाठी आवश्यक तो पैसा कसा मिळेल. अमेरिकेतील आमच्या सेवेस काही मित्र आमची अवश्य मदत करीत होते, पण मिळत असलेली देणगी आमच्याजवळ असलेले मोठे दर्शन पूर्ण करण्यासाठी पुरेसे नव्हते!

आम्ही बंगलोरला आल्यानंतर, देवाने जानेवारी 2001 मध्ये एक सॉफ्टवेयर सेवा कंपनी सुरू करण्यास मदत केली. फेब्रुवरी 2001 मध्ये, आम्ही लहान प्रमाणात आपले चर्च सुरू केले - माझ्या वडिलांच्या घराच्या बैठकीच्या खोलीत. सॉफ्टवेयर कंपनीचा दशमांश आम्ही चर्चला देऊ लागलो आणि या पैश्याने बरेच काही करता

येऊ लागले—आम्ही भाड्याच्या सभागृहात चर्च हलविले, जरूरी ती उपकरणे आम्ही विकत घेऊ लागलो, पुस्तके छापू लागलो, आणि ती विनामूल्य वाटू लागलो, केबल टी.व्ही.वर प्रसारण देऊ लागलो, आणि इतर सेवासंस्थांची मदत करू लागलो. आमचा दृष्टांत मोठा होता, आणि पैश्याच्या अभावी आमचे हात बांधलेले नव्हते. आमच्याजवळ सुरूवात करण्यासाठी पुरेसे होते आणखी साधनसंपत्तीही होती.

मागे वळून पाहता, मला दिसून येते की देवाने कशाप्रकारे सेवेसाठी मला तयार करण्याकरिता माझ्या शिक्षणाचा आणि व्यवसायाचा उपयोग केला. माझ्या शिक्षणाशी आणि व्यवसायाशी जुडलेल्या अनेक संधी होत्या ज्याद्वारे देवाचे कार्य पुरे केले जात होते. मला पूर्ण विश्वास आहे की देवाची इच्छा आणि हेतू पार पाडण्याचे काम हे एक साधन आहे, दैवीय कार्यपद्धतीचा एक भाग आहे.

तुम्ही जे करावे असे देवाला वाटते, ते जेव्हा तुम्ही कराल, तेव्हा तुमच्या कामात अडखळण, बंधन येणार नाही, त्यात वाईट असे काही घडून येणार नाही. जर देव तुम्हाला काम करण्यास पाचारण करीत असेल, तर कामास एक वाईट बंधन वा अडथळा समजू नका. त्याकडे येथे पृथ्वीवर देवाच्या राज्याची वाढ करण्यासाठी, आपल्या जीवनासाठी एक दैवीय धोरण म्हणून पाहा.

# 5
# सात योग्य प्रवृत्ती

**इफिसकरांस पत्र 6:5-10**

5 **दासांनो** (कर्मचाऱ्यानो), **आपण ख्रिस्ताचेच आज्ञापालन करत आहोत अशा भावनेने तुम्ही भीत भीत व कापत कापत सरळ अंतःकरणाने आपल्या देहदशेतील धन्यांचे** (मालकांचे) **आज्ञापालन करत जा;**
6 **माणसांना खुश करणाऱ्या लोकांसारखे तोंडदेखल्या चाकरीने नव्हे, तर देवाची इच्छा मनापासून पूर्ण करणाऱ्या ख्रिस्ताच्या दासांसारखे** (कर्मचाऱ्यांसारखे) **ते करीत जा.**
7 **ही चाकरी माणसांची नव्हे तर प्रभूची आहे असे मानून ती सद्भावाने करा;**
8 **कारण तुम्हांला माहीत आहे की, प्रत्येक जण, मग तो दास असो किंवा स्वतंत्र असो, जे काही चांगले करतो, तेच तो प्रभूकडून भरून पावेल.**
9 **धन्यांनो** (मालकांनो), **तुम्हीही त्यांच्याशी तसेच वागा; व धमकावण्याचे सोडून द्या, कारण तुम्हांला हे ठाऊक आहे की, तुमचा व त्यांचा धनी** (मालक) **स्वर्गात आहे आणि त्याच्याजवळ पक्षपात नाही.**
10 **शेवटी, माझ्या बंधूंनो, प्रभूमध्ये व त्याच्या प्रभावी सामर्थ्यात बलवान होत जा.**

**कलस्सै 3:22-25**

22 **दासांनो** (कर्मचाऱ्यानो), **तुम्ही सर्व गोष्टींत आपल्या व्यवहारातल्या धन्यांच्या** (मालकांच्या) **आज्ञा पाळा, माणसांना संतोषवणाऱ्या नोकरांसारखे तोंडदेखल्या चाकरीने नका; तर सालस मनाने प्रभूची भीती बाळगून पाळा.**
23 **आणि जे काही तुम्ही करता ते माणसांसाठी म्हणून करू नका तर प्रभूसाठी म्हणून जिवेभावे करा.**
24 **प्रभूपासून वतनरूप प्रतिफळ तुम्हांला मिळेल हे तुम्हांला माहीत आहे. प्रभू ख्रिस्ताची चाकरी करत जा.**
25 **कारण अन्याय करणाऱ्याने केलेल्या अन्यायाबद्दल त्याला परत मिळेल; पक्षपात होत नाही.**

पवित्र शास्त्राचे दोन्ही परिच्छेद त्यांच्या शिकवणीबाबत अत्यंत

समान आहेत. आजच्या दिवसात मालक आणि गुलामाची संकल्पना नाही. तथापि, आपण "मालक" आणि "गुलाम" यांस "नियोक्ता" आणि "कर्मचारी" म्हणून समजू शकतो आणि ते आजच्या दिवसास समर्पक आहेत.

## पौल कामासंबंधाने सात प्रवृत्ती मांडतो

1) पौल शिकवितो की कर्मचारी म्हणून आम्ही आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेत असावे. याचा अर्थ आम्ही आपल्या कामाच्या ठिकाणी दिलेल्या सूचनांचे आणि नियमांचे पालन केले पाहिजे.

2) मग, आपल्या मालकाचा सन्मान किंवा आदर (भीत आणि कापत करावा लागेल. बंड न करता आणि आमच्या अधिकाऱ्यांपेक्षा अधिक माहीत आहे असा विचार करण्याऐवजी, कामाच्या ठिकाणी आमच्या अधिकाऱ्यांचा आम्ही मान राखला पाहिजे, त्यांचा आदर केला पाहिजे.

3) पौल शुद्ध हेतूविषयी बोलतो *"सालस मनाने"* किंवा *"जिवाभावाने."* आपल्या कामात प्रामाणिक असा. "सालस मनाने" अथवा "जिवाभावाने" हे शब्द ग्रीक शब्दांपासून येतात ज्यांचा अर्थ "स्वार्थाचा विचार न करता" असा देखील होतो. त्याचा अर्थ "उदारपणा, मुबलकता, औदार्य, साधेपणा" देखील होतो.

4) पौल विवेकशीलतेविषयी सुद्धा बोलतो—कोणीही पाहत नसतांना जबाबदार असणे. तो म्हणतो, *"माणसांना खुश करणाऱ्या लोकांसारखे तोंडदेखल्या चाकरीने नव्हे."* या मागील प्रेरणा हे सत्य आहे की आम्ही ख्रिस्ताचे कर्मचारी आहोत. हे समजणे महत्वाचे आहे की आम्ही कुठल्याही कंपनीसाठी काम करीत असू, त्यांचे कर्मचारी होण्यापूर्वी आम्ही ख्रिस्ताचे कर्मचारी आहोत. आमच्या कामाच्या ठिकाणी आम्ही ख्रिस्ताचे कर्मचारी आहोत. आम्ही ख्रिस्ताचे प्रतिनिधित्व करतो आणि *"ही चाकरी माणसांची नव्हे*

*तर प्रभूची आहे असे"* मानून आपले काम करतो, कारण आम्ही प्रभूसाठी काम करीत आहोत. आमचा मुख्य अधिकारी, मालक, ख्रिस्त आम्हास पाहत आहे. तो पाहत आहे की आम्ही आपल्या कामावर वेळेवर जात आहोत का. तो आमचा वक्तशीरपणा, आमचे हाजिरी, कामातून अनुपस्थित राहणे पाहतो. आम्ही काम का केले नाही, याचे खरे कारण तो जाणतो, आम्ही आजारी असल्याचे सांगून आणखी काही करण्यासाठी सुट्टी घेतल्यानंतरही. तो पाहतो की आम्ही कामाच्या वेळेचा उपयोग कसा करतो. आम्ही खरे काम करीत आहोत का, अथवा आपला वेळ वाया घालवित आहोत? आम्ही घेतलेले सर्व "सोपे" मार्ग तो पाहतो. तो पाहतो की आपण खोटी विधाने करतो, खोट्या रिपोर्ट्स देतो, इत्यादी.

5) पौल *"देवाची इच्छा मनापासून पूर्ण"* करण्याविषयी अथवा *"ही चाकरी प्रभूची आहे असे मानून ती सरळ अंतःकरणाने"* करण्याविषयी बोलत आहे. सोपविण्यात आलेले काम आम्ही संपूर्ण अंतःकरणाने करण्याची गरज आहे. अर्ध्या मनाने प्रयत्न करू नका. त्याऐवजी, तुमच्याजवळ जे काही आहे ते सर्वस्व कामी लावा. आपले सर्वोत्तम द्या. ते अशाप्रकारे करा जणू काही तुम्ही ते येशूसाठी करीत आहा.

6) पौल शिकवितो की आम्ही *"सद्भावाने चाकरी"* करावी. आपले काम न कुरकुरता अथवा तक्रार न करता करावे. मेसेज बायबलमध्ये अशाप्रकारे लिहिलेले आहे : "आपल्या चेहऱ्यावर हास्य ठेवून काम करावे, नेहमी हे लक्षात ठेवावे की काहीही का होईना, तुम्ही देवाची सेवा करीत आहात" (इफिसकरांस पत्र 6:7, मेसेज बायबल).

7) शेवटी पौल म्हणतो, *"तो प्रभूकडून भरून पावेल."* ख्रिस्त हा तुमचा खरा मालक आहे, जेव्हा तुम्ही उत्तम सेवा करता, तेव्हा तुम्ही ही खात्री करू शकता की तुम्हास प्रतिफळ देण्याबाबत तो विश्वासू आहे. जेव्हा तुम्ही तुमच्या प्रतिफळासाठी प्रभूकडे पाहता, तेव्हा तुम्ही जगासारखे वागणे सोडता! जगातील लोक कामाच्या

> ठिकाणी पुढे जाण्यासाठी इतरांना “धक्का देतात.” पण विश्वासणारे या नात्याने शांत, निश्चिंत असले पाहिजे आणि सद्भावाने काम करीत आपले सर्वोत्तम दिले पाहिजे. स्वर्गाचा परमेश्वर प्रतिफळ देईल. जेव्हा कामाच्या ठिकाणी देव बढती देण्याचे ठरवितो, तेव्हा कोणी मनुष्य आमच्या मार्गात उभा राहू शकत नाही! आणि लक्षात ठेवा, प्रतिफळाचा तो भाग येणाऱ्या जगात आहे. स्वर्गात जेव्हा तुमचे वतन तुम्हाला मिळेल तेव्हा तुम्हाला पूर्ण वेतन प्राप्त होईल!

कदाचित कलस्सै 3:22-25 चा संदेश मेसेज बायबलमध्ये सोपा आणि स्पष्ट आहे.

**कलस्सै 3:22-25 (मेसेज बायबल)**
**22 सेवकांनो, तुम्हाला तुमच्या पृथ्वीवरील स्वामींनी जे सांगितले आहे ते करा. फक्त कमीत कमी तेच करू नका ज्यामुळे तुमचे काम भागू शकते. सर्वोत्तम प्रयत्न कामी लावा.**
**23 तुमच्या वास्तविक मालकासाठी, देवासाठी,**
**24 आत्मविश्वासाने मनापासून कार्य करा जेव्हा तुम्ही तुमच्या वारशात याल तेव्हा तुम्हाला पूर्ण मोबदला मिळेल. हे नेहमी लक्षात ठेवा की तुम्ही ज्याची सेवा करत आहात तो अंतिम गुरु ख्रिस्त आहे.**
**25 निकृष्ट काम करणाऱ्या सेवकाला जबाबदार धरले जाईल. येशूचा अनुयायी असल्याने वाईट काम लपत नाही.**

## पूर्ण-वेळ सेवकांसाठी एक शब्द

एकदा बंगलोरमधील एका पाळकाने मला विचारले की मी माझ्या ऑफिसमध्ये किती तास काम करतो. मी त्याला सांगितले की मी 40 ते 50 तासांच्या दरम्यान एक सामान्य कार्य आठवडा काम करतो. तो आश्चर्यचकित झाला आणि त्याने कबूल केले की पूर्णवेळ पाळक म्हणून तो कधीकधी दिवसातून चार तासही काम करीत नाही. माझा ठाम विश्वास आहे की पूर्ण-वेळेचे सेवक, पाळक, सुवार्तिक, आणि इतर सेवासंस्था—यांनी “ऐहिक” नोकरीत असलेल्या समान कार्य नैतिकता आणि कार्यशिस्तीचे पालन केले पाहिजे. तुम्ही दिवसातून

किमान आठ तास, आठवड्यातून किमान 40 तास सेवेचे काम केले पाहिजे! कामाच्या चांगल्या सवयी राखण्यासाठी तुम्ही शिस्तबद्ध असले पाहिजे.

# 6
# तुमच्या कामाशी संबंधित अभिवचने

पवित्र शास्त्रात कामाशी संबंधित अनेक अभिवचने आहेत. आपण मागील भागात पाहिले आहे की आपण केलेल्या कार्याचे प्रतिफळ परमेश्वर आपल्याला देईल. जेव्हा आपण स्वर्गात परमेश्वराला भेटू तेव्हा आपल्या बक्षीसाचा काही भाग दिला जाईल आणि आपल्या बक्षीसाचा काही भाग आता या वर्तमान काळात दिला जातो. येथे काही आश्वासने आहेत ज्यांची आपण येथे असताना अपेक्षा करू शकतो.

## तुमच्या हातच्या कामावर आशीर्वाद

**अनुवाद 28:8**
**तुझ्या धान्याच्या कोठारांना व तू हात घालशील त्या प्रत्येक कामाला परमेश्वर बरकत देईल. तुझा देव परमेश्वर जो देश तुला देत आहे त्यात तो तुला बरकत देईल.**

**अनुवाद 28:12**
**परमेश्वर तुझ्यासाठी आपले उत्तम भांडार म्हणजे आकाश खुले करून तुझ्या भूमीवर योग्य ऋतूत पाऊस पाडील, व तुझ्या हातच्या सर्व कामाला बरकत देईल; तू पुष्कळ राष्ट्रांना उसने देशील पण तुला कोणाकडूनही उसने घ्यावे लागणार नाही.**

जुन्या कराराखाली देवाच्या लोकांना दिलेली ही वचने आहेत. जुन्या कराराचा देव नवीन कराराचाही तोच देव आहे. करार बदलले आहेत, परंतु कराराचा देव, त्याचे हृदय आणि त्याच्या लोकांना आशीर्वाद देण्याची त्याची क्षमता बदललेली नाही! म्हणून, कुठल्याही प्रकारचा संशय न बाळगता, आपण आपल्या हाताच्या सर्व कामांमध्ये आपला देव आशीर्वाद देईल अशी अपेक्षा करू शकतो. तुमच्या

कामात देव तुम्हाला आशीर्वाद देईल अशी अपेक्षा करा. दररोज तुम्ही तुमच्या कामाच्या ठिकाणी जाताना, तुमच्यावर प्रभुचा आशीर्वाद असेल अशी अपेक्षा करा!

## पदोन्नती परमेश्वराकडून मिळते

**अनुवाद 28:13**
**तुझा देव परमेश्वर ह्याच्या ज्या ह्या आज्ञा मी आज तुला देत आहे त्या  ऐकून तू काळजीपूर्वक पाळशील तर परमेश्वर तुला पुच्छ नव्हे तर मस्तक करील, तू खालीd नव्हे तर वर राहशील.**

**स्तोत्र 75:6,7**
**6 कारण उन्नती ही पूर्वेकडून नव्हे, पश्चिमेकडून नव्हे, व अरण्याकडूनही नव्हे;**
**7 तर न्याय करणारा देव आहे; तो एकाला खाली पाडतो व दुसऱ्याला वर चढवतो.**

देव तुमच्यासाठी आहे. तुमची पदोन्नती होण्यासाठी देवच जागा करतो. देव तुमच्या कामातील परिश्रम पाहतो आणि तो तुमच्या पदोन्नतीसाठी जागा तयार करेल. तुम्हाला "धक्का देऊन पुढे जाण्याची," "तुमच्या सहकाऱ्यांशी चढाओढ करण्याची" किंवा तुमच्या नियोक्त्यांना "लाच देण्याचा" प्रयत्न करण्याची गरज नाही. फक्त तुमचे सर्वोत्तम देण्यासाठी परिश्रमपूर्वक काम करा आणि तुमच्या पदोन्नतीचा मार्ग प्रभूने मोकळा करावा अशी अपेक्षा करा.  आणि तुमच्या पदोन्नतीचा मार्ग प्रभूने मोकळा करावा अशी अपेक्षा करा.  मला आठवते की मी शिकागोमध्ये एका सॉफ्टवेअर कंपनीत काम करीत असताना खूप निराश झालो होतो. मी प्रार्थना करीत असे, "देवा, माझी उन्नती कर कारण मला वाटत नाही की माझा पूर्ण उपयोग होत आहे. मला विश्वास आहे की मी अधिक जबाबदारी हाताळू शकतो आणि लोकांच्या संघाचे नेतृत्व करू शकतो." देवाच्या वचनानुसार, माझा विश्वास आहे की पदोन्नती परमेश्वराकडून येते. लवकरच माझी परिस्थिती बदलली

आणि माझ्या मॅनेजरने मला लोकांच्या टीमची जबाबदारी दिली आणि मला टीम लीडर बनवले. पदोन्नती परमेश्वराकडून आली!

## आपल्या कष्टाच्या फळाचा आनंद घ्या

**उपदेशक 3:13**
**तरी प्रत्येक मनुष्याने खावे, प्यावे व आपला सर्व उद्योग करून सुख मिळवावे हीही देवाची देणगी आहे.**

**स्तोत्र 128:1,2**
**1 जो पुरुष परमेश्वराचे भय धरतो, जो त्याच्याच मार्गांनी चालतो तो धन्य!**
**2 तू आपल्या श्रमांचे फळ खाशील; तू सुखी होशील, तुझे कल्याण होईल.**

**उपदेशक 5:18,19**
**18 मला जे बरे व मनोरम दिसून आले ते हे: मनुष्याने खावे, प्यावे व ह्या भूतलावर जे श्रम तो करतो त्या सर्वांत देवाने त्याला दिलेल्या आयुष्यभर सुख भोगावे; कारण एवढेच त्याच्या वाट्यास आहे.**
**19 कोणा मनुष्याला देवाने धनसंपत्ती दिली असेल, तिचा उपभोग घेण्याची, आपला वाटा उचलण्याची व परिश्रम करताना आनंद पावण्याची शक्ती दिली असेल, तर ही देवाची देणगीच समजावी.**

तुमच्या श्रमात आनंदित होण्याची—तुमच्या कामाचे फळ उपभोगण्याची क्षमता—ही देवाकडून मिळालेला एक आशीर्वाद आणि भेट आहे. देवावर विश्वास ठेवा की तुम्हाला तुमच्या श्रमाचे फळ नक्कीच मिळेल. कष्ट करणारे बरेच आहेत. पण त्यांच्या श्रमातून जे मिळते ते वाऱ्याने वाहून गेलेले दिसते. त्यांचा पगार छिद्र असलेल्या पिशवीत गेल्याचे दिसते. इतरांकडे भरपूर पैसा असला तरीही आनंद आणि शांती नाही. भरपूर पैसा असूनही असंतोष, कलह, असमाधान आहे. तुमच्या बाबतीत हे असण्याची गरज नाही. देवावर विश्वास ठेवा की तुम्ही तुमच्या श्रमाचे फळ खाल, त्याचा आनंद घ्याल आणि त्यात आनंदी व्हाल!

# 7
# नवीन जगात काम करणे

**यशया 65:17-25**

**17 “पाहा, मी नवे आकाश व नवी पृथ्वी निर्माण करतो; पूर्वीच्या गोष्टी कोणी स्मरणार नाहीत, त्या कोणाच्या ध्यानात येणार नाहीत.**

**18 परंतु जे मी उत्पन्न करतो त्याने तुम्ही सदा आनंदी व्हा व उल्लास पावा; पाहा, मी यरुशलेम उल्लासमय, तिचे लोक आनंदमय करतो.**

**19 मी यरुशलेमेविषयी उल्लास पावेन, माझ्या लोकांविषयी आनंद पावेन, तिच्यात शोकाचा व आकांताचा शब्द पुन्हा ऐकू येणार नाही.**

**20 ह्यापुढे थोडे दिवस वाचणारे अर्भक तिच्यात जन्मास येणार नाही. जो पुऱ्या आयुष्याचा होणार नाही असा म्हातारा तिच्यात असणार नाही; तेथील जो कोणी तरुणपणी मरेल तो शंभर वर्षांचा होऊन मरेल.**

**21 ते घरे बांधून त्यांत राहतील. द्राक्षांचे मळे लावून त्यांचे फळ खातील.**

**22 ते घरे बांधतील आणि त्यांत दुसरे राहतील, ते लावणी करतील आणि फळ दुसरे खातील, असे व्हायचे नाही; कारण वृक्षाच्या आयुष्याप्रमाणे माझ्या लोकांचे आयुष्य होईल व माझे निवडलेले आपल्या हाताच्या श्रमाचे फळ पूर्णपणे भोगतील.**

**23 त्यांचे परिश्रम व्यर्थ जाणार नाहीत, संकट तत्काळ गाठील अशा संततीला ते जन्म देणार नाहीत, कारण परमेश्वराने आशीर्वाद दिलेली ती संतती आहे व त्यांची मुले त्यांच्याजवळ राहतील.**

**24 त्यांनी हाक मारण्यापूर्वी मी उत्तर देईन, ते बोलत आहेत तोच मी त्यांचे ऐकेन, असे होईल.**

**25 तेव्हा लांडगा व कोकरू एकत्र चरतील, सिंह बैलाप्रमाणे कडबा खाईल; सर्पाचे खाणे धूळ होईल. माझ्या सगळ्या पवित्र डोंगरावर ती उपद्रव देणार नाहीत. नासधूस करणार नाहीत,” असे परमेश्वर म्हणतो.**

**दानीएल 7:13,14,18,22,27**

**13 तेव्हा मी रात्रीच्या दृष्टान्तात पाहिले तर आकाशातील मेघांवर आरूढ होऊन, मानवपुत्रासारखा कोणी आला; तो त्या पुराणपुरुषाकडे आला व त्याला त्यांनी त्याच्याजवळ नेले.**

**14 सर्व लोक, सर्व राष्ट्रे व सर्व भाषा बोलणारे लोक, ह्यांनी त्याची सेवा करावी म्हणून त्याला प्रभुत्व, वैभव व राज्य ही दिली; त्याचे प्रभुत्व अक्षय व अढळ आहे; त्याचे राज्य अविनाशी आहे.**
**18 तथापि परात्पर देवाचे जे पवित्र जन त्यांना राज्य प्राप्त होईल; ते राज्य सर्वकाळ युगानुयुग, त्यांच्या ताब्यात राहील.'**
**22 शेवटी पुराणपुरुष आला तेव्हा परात्पर देवाच्या पवित्र जनांना न्याय मिळाला आणि त्या पवित्र जनांना राज्याचे स्वामित्व मिळण्याचा समय आला; ह्याचेही मर्म कळावे म्हणून मी इच्छा दर्शवली.**
**27 राज्य, प्रभुत्व व संपूर्ण आकाशाखालील राज्यांचे वैभव ही परात्पर देवाची प्रजा जे पवित्र जन ह्यांना देण्यात येतील; त्याचे राज्य सनातन आहे, सर्व सत्ताधीश त्याची सेवा करतील, त्याचे अंकित होतील."**

**प्रकटीकरण 2:25-27**
**25 इतकेच करा की, जे तुमच्याजवळ आहे ते मी येईपर्यंत दृढ धरून राहा.**
**26 जो विजय मिळवतो व शेवटपर्यंत माझी कृत्ये करत राहतो 'त्याला' माझ्या पित्यापासून मला मिळाला तसा 'राष्ट्रांवरचा' अधिकार मी 'देईन,'**
**27 'आणि जसा मातीच्या भांड्यांचा चुराडा करतात तसा तो लोहदंडाने त्यांच्यावर अधिकार गाजवील.'**

स्वर्गाबद्दल आणि सार्वकालिक जीवन कसे असेल याबद्दल आमच्यापैकी अनेकांच्या वेगवेगळ्या कल्पना आहेत. आमच्यापैकी काहींना वाटते की सार्वकालिक जीवन सार्वकालिक सुट्टीची वेळ असेल जेव्हा आम्हा सर्वांना फक्त ढगावर तरंगत राहावयास मिळेल आणि आणि आम्ही आपल्या स्वर्गीय राजमहालातून बाहेर आत येत राहू आणि स्वर्गदूतांसोबत देवाची स्तुती करीत असू! तथापि बायबल येणाऱ्या जगात काय अपेक्षा करावी याविषयी काही गोष्टी प्रगट करते. यशायातील परिच्छेद आम्हास दाखवितो की नवीन आकाश व नवीन पृथ्वी तयार झाल्यानंतरही परमेश्वराचे लोक घरे बनवितील आणि द्राक्षमळे लावतील. आम्ही श्रम करू आणि आंपल्या श्रमाचे फळ खाऊ. म्हणून, आपण नवीन जगात सुद्धा काम करणार आहोत!

दानीएल आणि प्रकटीकरणातील परिच्छेद आम्हास दाखवितात

की देवाचे लोक ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील राज्याच्या प्रशासनात आणि शासनात मदत करितील. जेव्हा ख्रिस्त येईल आणि त्याचे राज्य स्थापन करील तेव्हा देवाचे लोक ख्रिस्ताचे शासन चालविण्यात गुंतलेले असतील. म्हणून असे दिसते की आम्ही सदैव  काम करीत असणार! आपण कामाचा आनंद घेऊ या. ते देवाने तयार केलेले, देवाने ठरविलेले कार्य आहे. पृथ्वीवर त्याचे हेतू पार पाडण्यासाठी तुमचे काम एक माध्यम बनो.

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"*** **(रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"*** **(प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"*** **(रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses-Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Speaking in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

**किशोरवयीन मुलांसाठी**

**वैयक्तिक सल्ला**

**नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने**

**शिक्षेतील उणीव**

**कामाशी संबंधित समस्या**

**कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक**

**पालक/मुले/भावंडे/समवयस्क**

**वर्तणूक विकार**

**व्यक्तिमत्व विकार**

**मानसिक भावनिक / अडचणी**

**तणाव/आघात**

**मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन**

**आध्यात्मिक समस्या**

**लाईफ कोचिंग**

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता.

**Account Name:** All Peoples Church
**Account Number:** 50200068829058
**IFSC Code:** HDFC0004367
**Bank:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवाः*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**


## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

विवाह ही देवाची कल्पना आहे असे आपण सर्व मानतो,

म्हणून, आम्ही लग्नाचा आनंद घेतो.
आम्हाला माहित आहे की चर्च किंवा मंडळी ही देवाची कल्पना आहे,
म्हणून, आम्ही चर्चचा आनंद घेतो.

चांगली बातमी ही आहे की काम देखील देवाची कल्पना आहे.
देवाने त्याची स्थापित केली आहे! तर, कामाचा आनंद घ्या!




**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org


ALL PEOPLES CHURCH